PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Satya Savitri Aani Satyavan
Year: 2012

Song: Madansami Tujhi Me Menka
Lyricist:

मदनसामी तुझी मी मेनका
हे लूट लूट रे जवानी ही तुझी
रात अशीही मस्त नशीली
रात अशी ही मस्त नशीली
प्रेमगंध ल्याली
इश्करंग उधळी
मदनसामी तुझी मी मेनका

हवाहवासा वाटतोस तू
रूप देखणा मर्दानी तू
हं...वाट कशाची बघशी आता
तुला हवी ती मीच कामिनी
एकांताच्या नभातली मी
हो...हा...
एकांताच्या नभातली मी
शुक्राची चांदणी
हो...हो...
मिठीत माझ्या मस्त मोहिनी
हो मिठीत माझ्या मस्त मोहिनी
बेहोशीचे तूफान तू

हो लूट लूट रे जवानी ही

हं...आसपास ही नाही कुणी
डाव दोघे रंगवू इथे
हं प्याला नको मदिरेचा
मदिराक्षी मी ही तृषार्थ रे
रूप अप्सरेचे तनु उर्वशीची
हवी झिंग कशाला तुझी
कधी संग हिचा
कधी रंग हिचा
दिसे नित्य पद्मिनी नभी
हे वीज माझी आता पेल तू
नागिणीचा डंख झेल तू
मदनाचा तू पुतळा
मुक्त रासरंगी खेळ तू
हो...
मोहरीले आसुसले
तप्त भूमी जशी
आर्त पाहे वाट पावसाची

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*